**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC) स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: नादेप्र-१०१७/प्र.क्र.११५/राकृवियो कक्ष**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०४२
तारीख: ०७ नोव्हेंबर, २०१७

**वाचा :**

१. कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. हअप्र-०७१६/प्र. क्र. ८२/राकृवियो कक्ष, दि. ०७/०७/२०१६
२. कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. हअप्र-०७१६/प्र. क्र. ८२/राकृवियो कक्ष, दि. १०/०८/२०१६
३. कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक :- हअप्र-०७१६ /प्र.क्र.८२/राकृवियो कक्ष, दि.१७/०१/२०१७

**प्रस्तावना :**

विदर्भ व मराठवाडयातील सुमारे ४००० दुष्काळग्रस्त गावांमध्ये तसेच विदर्भातील पुर्णा नदीच्या खोऱ्यातील खारपाण पट्टयातील सुमारे ९०० गावांमध्ये आगामी ६ वर्ष कालावधीत जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने रु. ४००० कोटी अंदाजित खर्चाचा नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (पूर्वीचे नांव हवामान अनुकूल कृषि विकास प्रकल्प) राबविण्यास दि.७.७.२०१७ रोजीच्या शासन निर्णयांन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे. या प्रकल्पाची जिल्हा स्तर, उप विभाग स्तर व गाव समूह स्तरावर अंमलबजावणी करण्यात येणार असून प्रकल्पांतर्गत मराठवाडा, विदर्भ व नाशिक विभागातील मिळून एकूण १५ जिल्हयांचा समावेश आहे (औरंगाबाद, जालना, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, परभणी, बीड, हिंगोली, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, वर्धा, जळगाव). प्रकल्पांतर्गत या १५ जिल्ह्यातील हवामान बदलास अतिसंवेदनक्षम ठरणारी ४२१० गावे व पूर्णा नदीच्या खो-यातील खारपाण पट्ट्यातील भूजल क्षारतेची समस्या असलेली ९३२ गावे, अशा एकूण ५१४२ गावांची निवड करण्यात आलेली आहे.

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत गाव पातळीवर हाती घ्यावयाच्या कामांचे सुक्ष्म नियोजन करुन प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने प्रकल्पांतर्गत निवडलेल्या प्रत्येक गावामध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ (४९) अन्वये प्रकल्प समिती स्थापन करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यानुषंगाने, प्रकल्पांतर्गत समाविष्ट गावांच्या प्रत्येक ग्राम पंचायतीमध्ये "ग्राम कृषि संजीवनी समिती {Village Climate Resilience Agriculture Management Committee (VCRMC)}" स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे. :-

**शासन निर्णयः**

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत निवडलेल्या ५१४२ गावांसाठी संबंधीत गावांच्या प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ (४९) अन्वये ग्रामसभेव्दारे ग्राम कृषि संजीवनी समिती {Village Climate Resilience Agriculture Management Committee (VCRMC)} स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रकल्पांतर्गत निवडलेल्या ५१४२ गावांसाठी ग्राम कृषि संजीवनी समिती संबंधीत गावांच्या ग्रामपंचायतीची विकास समिती म्हणून कार्यरत राहील.

२. गावातील शेतीच्या सर्वांगीण विकासासाठी गावामधील नैसर्गिक साधन संपत्तीचा महत्तम विनियोग करण्याच्यादृष्टीने गाव पातळीवर सुक्ष्म नियोजन करुन सविस्तर प्रकल्प आराखडे तयार करण्यासाठी तसेच, प्रकल्पांतर्गत हाती घ्यावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्याकामी कृषि विभागास सहाय्य करण्याकरिता गावातील कृषि व ग्राम विकास क्षेत्राशी संबंधित असलेल्या १३ व्यक्तींचा ग्राम कृषि संजीवनी समितीमध्ये (VCRMC) कार्यकारी सदस्य म्हणून समावेश असेल. सदर समितीची रचना पुढीलप्रमाणे राहील :-

| अ. क्र. | समिती सदस्य व त्यांचा प्रवर्ग / कार्यक्षेत्र | सदस्य संख्या | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | सरपंच | १ | पदसिध्द अध्यक्ष |
| २ | उप सरपंच | १ | पदसिध्द सदस्य |
| ३ | ग्रामपंचायत सदस्य- (पुरुष १ व महिला १) | २ | सदस्य |
| ४ | प्रगतशील शेतकरी[1] (सर्वसाधारण-१, अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / विमुक्त जाती / भटक्या जमाती- १) | २ | सदस्य |
| ५ | महिला शेतकरी (सर्वसाधारण-१, अनुसूचित जाती वा अनुसूचित जमाती-१, विमुक्त जाती वा भटक्या जमाती -१) | ३ | सदस्य |
| ६ | शेतकरी उत्पादक गट/ कंपनी प्रतिनिधी[2] | १ | सदस्य |
| ७ | महिला बचत गट प्रतिनिधी | १ | सदस्य |
| ८ | कृषी पूरक व्यावसायिक शेतकरी[3] | २ | सदस्य |
| **अ** | **एकूण कार्यकारी सदस्य** | **१३** | |
| **ब** | **अकार्यकारी सदस्य** | | |
| ९ | कृषि सहाय्यक[4] | १ | पदसिद्ध तांत्रिक सदस्य |
| १० | ग्राम सेवक[5] /ग्राम विकास अधिकारी | १ | सदस्य सचिव |
| ११ | समूह सहाय्यक[6] | १ | सह सचिव |
| १२ | कृषि मित्र[7] | १ | विस्तार कार्य प्रेरक |
| **ब** | **एकूण अकार्यकारी सदस्य[8]** | **३** | |

टिप :-

१. प्राधान्याने महाराष्ट्र शासन/ जिल्हा परिषद पुरस्कार प्राप्त शेतकरी, कृषी विद्यापीठ / कृषी विज्ञान केंद्रामार्फत गौरवलेले शेतकरी अन्यथा, कृषी विज्ञान मंचाचे सदस्य, इ. पैकी सध्या शेती कसत असलेले गावातील शेतकरी

२. गावातील शेतकरी उत्पादक कंपनी वा गट तसेच, शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या महिला बचत गट प्रतिनिधीचे संबधित कंपनी / गटाकडून नामनिर्देशन प्राप्त करून घ्यावे.

३. शेती बरोबरच बिजोत्पादन, अन्नधान्य / फळे / भाजीपाला प्रक्रिया, सेंद्रिय खत निर्मिती, कृषी पर्यटन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, रोपवाटिका, इ. पैकी कोणताही कृषि पूरक व्यवसाय करणारा/री शेतकरी.

४. पदसिद्ध तांत्रिक सदस्य व समिती सचिवास मतदानाचा अधिकार असणार नाही.

५. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पातंर्गत संबंधित गावांच्या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक

६. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत संबंधित गाव समुहाकरिता नियुक्त समूह सहाय्यक

७. कृषी विभागाच्या आत्मा यंत्रणेमार्फत निवडलेले कृषि मित्र

८. अकार्यकारी सदस्यांनी समितीमध्ये चर्चेत सहभागी होऊन तांत्रिक सल्ला द्यावा वा आपले मत नोंदवावे तथापि, एखाद्या प्रकरणी निर्णय घेतेवेळी समितीने मतदान घेतल्यास अकार्यकारी सदस्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही

३. ग्राम कृषि संजीवनी समितीची स्थापना व १३ सदस्यांची निवड संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्राम सभेद्वारे करावी. ज्या गावांमध्ये ग्रुप ग्रामपंचायत असेल तेथे ग्राम कृषि संजीवनी समितीतील सरपंच व उप सरपंच पदावरील व्यक्ती वगळता अन्य कार्यकारी व अकार्यकारी सदस्य म्हणून ज्या गावांमध्ये प्रकल्प राबविण्यात येणार आहे त्याच गावातील सदस्यांचा समावेश करावा.

४. ग्राम कृषि संजीवनी समिती मधील एकूण १३ कार्यकारी सदस्यांपैकी किमान ९ सदस्य अल्प भूधारक (१ ते २ हे. पर्यंत जमीन धारणा) अथवा अत्यल्प भूधारक (१ हे. पर्यंत जमीनधारणा) असावेत. तसेच परिच्छेद क्र. २ मधील तक्त्यात नमूद केल्यानुसार १३ कार्यकारी सदस्यांमध्ये विविध प्रवर्गातील सदस्यांचा समावेश असावा.(सर्वसाधारण, अनुसूचित जाती व जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, पुरुष व महिला)

५. त्याचप्रमाणे, परिच्छेद क्र. २, ३ व ४ मधील निकषानुसार निवडण्यात येणाऱ्या १३ कार्यकारी सदस्यांपैकी किमान ७ सदस्य महिला असणे बंधनकारक राहील सबब, सरपंच व उप सरपंच पदांवरील व्यक्तीं पुरुष वा महिला प्रवर्गातील असल्याचे लक्षात घ्यावे व उर्वरीत ११ सदस्यांच्या पदावर आवश्यक संख्येत महिला प्रवर्गातील व्यक्तींची निवड करावी.

६. सदर समितीचे सदस्य सचिव हे संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवकग्राम विकास अधिकारी/ असल्याने त्यांनी या समितीच्या बैठकाचे आयोजन करणे व दस्तऐवज ईत्यादिची नोंद ग्रामपंचायतीच्या दप्तरात ठेवणे आवश्यक असेल.

७. तसेच या समितीचे सह सचिव हे समूह सह्यायक असल्याने ते समितीच्या बैठकीकरीता आवश्यक असलेले सर्व कागदपत्रे, विविध माहिती व विवरणपत्रे तयार करून बैठकीत सादर करतील. तसेच

बैठकांमध्ये झालेल्या विविध निर्णयांची अमंलबजावणी करण्याकरीता अनुषंगिक पुढील सर्व कार्यवाही करतील. याशिवाय योजनेतंर्गत गावसमूहाशीसंबंधित सर्व टपाल, लेखे व अन्य दस्तऐवजाच्या माहितीचे प्रकल्प संचालकाकडून प्राप्त होणा-या सूचनानुसार जतन करतील.

८. **समिती अध्यक्षांचा व सदस्यांचा कालावधी**

I. कृषि संजीवनी समितीच्या अध्यक्षांचा कालावधी हा त्यांच्या सरपंच पदाच्या कालावधी एवढाच राहील.

II. कृषि संजीवनी समितीमधील उप सरपंच व ग्रामपंचायतीच्या सदस्यांचा कालावधीही त्यांच्या सदस्यपदाच्या कालावधी एवढाच राहील.

III. प्रत्येक ग्रामपंचायतीकरीता स्वतंत्र कृषि संजीवनी समिती स्थापन करण्यात यावी.

IV. नवीन ग्रामपंचायत गठित झाल्यावर आधीच्या समितीचे सदस्य म्हणून कार्य केलेल्या व्यक्ती समितीच्या सदस्यपदी निवडण्यास पात्र ठरत असतील तर त्यांची पुर्ननियुक्ती करता येईल

I. **कृषि संजीवनी प्रकल्प समितीच्या जबाबदाऱ्या**

I. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांचे सविस्तर प्रकल्प नियोजन करुन प्रकल्प आराखडे तयार करण्यास प्रकल्प यंत्रणा व कृषि विभागास सहाय्य करणे.

II. कृषि संजीवनी समितीच्या सभा आवश्यकतेनुसार नियमितपणे आयोजित करून सभेतील निर्णयांच्या अनुषंगाने कार्यवाहीचा पाठपुरावा व समन्वय करणे.

III. गावनिहाय सहभागीय सुक्ष्मनियोजन आराखड्यास तसेच सविस्तर प्रकल्प आराखड्यास ग्रामसभेची मान्यता घेणे.

IV. मंजूर वार्षिक कृती आराखड्या नुसार घटकांची व कामांची अंमलबजावणी करणे.

V. प्रकल्पाचा लाभ लहान व सिमान्तिक शेतकरी, अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीतील शेतकरी व महिला शेतकऱ्यांना मिळण्याच्या उद्देशाने प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनानुसार पात्र शेतकऱ्यांची संबधित घटकाच्या लाभासाठी निवड करणे.

VI. निवडलेल्या शेतकऱ्यांना संबधित घटकांचे निकष समजावून आवश्यक तेथे लाभार्थी हिस्सा जमा करण्यास प्रवृत्त करणे व या प्रयोजनार्थ गरजेनुसार पात्र शेतकऱ्यांना स्थानिक बँकेकडून अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणे आणि घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड करण्यास लाभार्थ्यांना प्रोत्साहितकरणे.

VII. समायिक जमिनीवर मृद्संधारण, जलसंधारण, वृक्षलागवड इ. कामे तांत्रिक दृष्ट्या परिपूर्णपणे करून घेणे व झालेल्या कामांची देखभाल - दूरुस्ती करणे.

VIII. हवामानातील आकस्मिक बदलांमुळे निर्माण होणाऱ्या विपरीत /आपत्कालीन परिस्थितीशी सामना करण्यासाठी तज्ञांच्या सहकार्याने गावाचा आपत्कालीन पीक आराखडा तयार करणे व अशी परिस्थिती उद्भवल्यास आराखड्याची अंमलबजावणी करणे.

IX. समितीस वितरीत निधीतून प्रकल्पाची कामे वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे करणे.

X. प्रकल्पांतर्गत केल्या जाणा-या सर्व कामांच्या नोंदी करणे व संपूर्ण अभिलेख ग्रामपंचायत कार्यालयात जतन करणे.

XI. समायिक कामे पूर्ण झाल्यानंतर तसेच वैयक्तिक लाभासाठी ज्या शेतकऱ्यांना पूर्व संमती दिली आहे त्यांनी संबधित बाब पूर्ण केल्यानंतर गरजेनुसार वरिष्ठ कृषि कार्यालयाकडे निधीची मागणी करणे.

XII. प्रकल्पांतर्गत चालू असलेल्या व पूर्ण करण्यात आलेल्या सर्वबाबींचे सामाजिक लेखा परीक्षण करणे.

XIII. प्रकल्पांतर्गत झालेल्या कामांचा तपशील व खर्च ग्रामसभेसमोर सादर करणे.

XIV. समितीच्या कामकाजाचे वार्षिक विवरण स्वतंत्रपणे ठेवण्यांत यावे.

XV. प्रकल्प क्षेत्रामध्ये प्रकल्पातील घटकांच्या अंमलबजावणीमुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांचा उपभोक्ता गट निर्माण करून त्यांना प्रकल्पांतर्गत निर्माण झालेल्या सर्वमत्तांच्या जबाबदारीने वापरासाठी व देखभालीसाठी प्रवृत्त करणे.

XVI. गावातील शेती विषयक गरजा भागविण्यासाठी सदर प्रकल्पांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीबरोबरच कृषि व संलग्न विभागाच्या वेगवेगळया योजनांशी सांगड घालण्यासाठी समन्वय साधणे.

XVII. कृषि संजीवनी समितीचे अर्थिक व्यवहार व प्रशासकिय कामकाज सुरळीतपणे पारपाडण्यासाठी समितीचे अध्यक्ष व संबंधित गावातील कृषि सहाय्यक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्यात यावे. सर्व रकमांची प्रदाने समितीने घेतलेल्या ठरावानुसार व शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार करण्यात यावे.

XVIII. दैनंदिन रोख पुस्तिका ठेवणेत यावी व दर महिन्याला त्याचा ताळ मेळ घेण्याची जबाबदारी कृषि सहाय्यकावर राहील. लेखा परिक्षणाचे वेळी अभिलेख दाखविण्याची जबाबदारी कृषि सहाय्यक व समूह सहाय्यक यांचेवर संयुक्तपणे राहील.

XIX. मासिक प्रगती अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणेची जबाबदारी समूह सहाय्यक यांचेवर राहील.

XX. कृषि संजीवनी समितीचे सचिव यांनी गैरवर्तन / गैरव्यवहारकेल्याचे दिसूनआल्यास किंवा प्रकल्पाच्या नेमून दिलेल्या कामात कुचराईकेल्यास कृषि संजीवनी समिती कारणासह ठराव घेऊन त्यांचेवर प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करू शकेल व अशाप्रकरणी चौकशी करून कारवाई करण्याचीजबाबदारीजिल्हाअधिक्षककृषिअधिकारीयांचीराहील.

XXI. समितीच्या अध्यक्षांनी गैरवर्तन / गैर व्यवहार केल्याचे दिसून आल्यास ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदीनुसार तसेच शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनानुसार कारवाई करण्यात येईल.

XXII. अनुसूचित क्षेत्रामध्ये समितीचे कार्यान्वयन पेसा कायद्यातील तरतुदीनुसार होईल.

९) सदर शासन निर्णय ग्राम विकास विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९/परा-३ , दि.१.११.२०१७ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०) .सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०७१६५८०५६१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2017.11.07 16:48:43 +05'30'

**(श्रीकांत चं. आंडगे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
२. मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन), कृषिव पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधानपरिषद,विधानभवन,मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य /महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई.
११.प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे,
१३. प्रकल्प संचालक, हवामान अनुकूल कृषि प्रकल्प, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई.
१४. उप सचिव/ सह सचिव (सर्व), कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.
१५. विभागीय आयुक्त (औरंगाबाद / नाशिक/ अमरावती / नागपूर विभाग)
१६. जिल्हाधिकारी (सर्व)
१७. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
१८. जिल्हा अधीक्षक कृषिअधिकारी (सर्व)
१९. महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर,
२०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२१. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
२२. वित्त विभाग (व्यय १ / विसु १), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
२३. नियोजन विभाग ( कार्यासन १४३१), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
२४. निवड नस्ती